**एकरूप**

वाटेवरल्या सांजसावल्या
पायांशी त्या कधी बोलल्या
काळोखीचे शब्द लेवूनी
गूढ कुणाचे गीत गायल्या ॥

गडद स्वरांचे अगम्य गुंजन
जाणून घ्याया त्यांचे ही मन
व्हावे बिंब- प्रतिबिंब तयांचे
अस्पष्ट हुंकार काळा रेखून ॥

वाटेवरल्या सांजसावल्या
तेजाशी त्या गूज बोलल्या
दडवूनी दुखः उराशी त्या
देहामध्ये मिसळून गेल्या ॥

**---संध्या रानडे**